**नाशिक महानगरपालिका,नाशिक**

**कामगार कल्याण विभाग**

**ई-कोटेशन सुचना नोटिस सन २०२३-२४**

**कामाचे नाव:- नाशिक महानगरपालिकेच्या कायम सेवेत असलेल्या सफाई कर्मचा-यांचे पाल्यांना मोफत् वहया पुरविणे बाबत.**

**सन** २०२३ - २०२४ या कालावधी मध्ये नाशिक महानगरपालिकेतील कायम सेवेत असलेल्या **सफाई कर्मचा-यांचे पाल्यांना मोफत वहया पुरविणे** कामी मुळ उत्पादक, उत्पादनाचे अधिकृत वितरक, विक्रेते यांचेकडुन कोटेशन पध्दतीने खालील प्रमाणे वस्तु पुरविणे करीता सर्व कारांसह कोटेशन व्दारे दर मागविण्यात येत आहे.

| अ.न. | तपशिल<br>( मेक.नवनीत/सुंदरम/क्लासमेट कंपनीच्या) | मागणी नग संख्या |
|---|---|---|
| १) | एक रेघी १०० पेजेस ६५ जी एस एम जम्बो वही १८-२४ सी एम सुबक व आकर्षक बांधणी, स्पेसिफिकेशन नुसार | **२०१८** |
| २) | एक रेघी २०० पेजेस वही ६५ जी एसएम जम्बो साईज १८-२४ सी एम सुबक व आकर्षक बांधणी, स्पेसिफिकेशन नुसार | **२०१८** |
| ३) | दुरेघी १०० पेजेस वही ६५ जी एसएम जम्बो साईज १८-२४ सी एम सुबक व आकर्षक बांधणी, स्पेसिफिकेशन नुसार | **१३५** |
| ४) | चार रेघी १०० पेजेस वही ६५ जी एसएम जम्बो साईज १८-२४ सी एम सुबक व आकर्षक बांधणी, स्पेसिफिकेशन नुसार | **१३५** |
| ५) | चित्रकला ३६ पेजेस वही ६५ जी एस एम जम्बो साईज २१-२९.०७ सी एम सुबक व आकर्षक बांधणी, स्पेसिफिकेशन नुसार | **२९०** |
| ६) | प्रयोग वही १०० पेजेस वही ६५ जी एसएम जम्बो साईज २१-२९.०७ सी एम सुबक व आकर्षक बांधणी, स्पेसिफिकेशन नुसार | **१८३** |
| | **एकुण** | **४७७९** |

**अटीशर्ती**

१. वरील कामाचे कोटेशन पत्रक अटीशर्ती सह www.nmc.gov.in या संकेत स्थळावर दिनांक.२७/०७/ २०२३ ते दिनांक ०३/ ०८ /२०२३ रोजी दुपारी १२:०० वाजेपावेतो उपलब्ध आहे.
२. कोटेशन पाकीट सादर करणेची अंतिम तारीख दि. ०३/०८/२०२३ रोजी दुपारी ३:०० वाजेपर्यंत राहील. मुदतीनंतर प्राप्त होणारी कोटेशन पाकीटे स्विकारली जाणार नाही.
३. प्राप्त कोटेशन पाकीट दिनांक ०३/०८/२०२३ रोजी सायंकाळी ५:०० वाजता उघडण्यात येतील. त्या करीता कोटेशन सादर करणाऱ्या कोटेशन धारकास/ त्यांचे प्रतिनिधीस उपस्थित राहता येईल.
४. कोटेशन पाकीट कामगार कल्याण विभाग राजीव गांधी भवन शरणपुर रोड नाशिक-२, येथे स्विकारण्यात येतील.
५. सदर सदरच्या कामाकरीता वेगळा वाहतूक खर्च देण्यात येणार नाही.
६. सदरचे दरपत्रक हे सर्व करासह अनुषंगीक खर्चासह दर नमुद करायचे आहे. कोणत्याही कराची जबाबदारी नाशिक महानगरपालिकेवर राहणार नाही.
७. कोटेशन धारकाने दोन लिफाफे देणे आवश्यक आहे. १) तांत्रिक लिफाफा कोटेशन धारक /एजन्सी हि नाशिक मनपा हद्दीतील स्थानिक असणे आवश्यक आहे. कोटेशन सोबत पॅनकार्ड, शॉप ॲक्ट लायसन्स/ उद्योग आधार प्रमाणपत्र ,GST नोंदणी प्रमाणपत्र, मुळ उत्पादक/अधिकृत विक्रेते असल्यास त्याबाबतचे कागदपत्र (लागू असल्यास) असल्याशिवाय कोटेशनचा विचार केला जाणार नाही.
८. अतांत्रीक लिफाफा---- दर पत्रक आवश्यक
९. कोटेशन स्विकारणे / नाकारण्याचा अधिकार निम्नस्वाक्षरीकार यांना राहील.

उपरोक्त तपशिलात नमुद कंपनी / Brand च्या वहयांचाच पुरवठा करणे आवश्यक राहील. दरपत्रकात प्रत्येक वहयांच्या प्रकारानुसार किमान दर (L1)नमुद केलेल्या कोटेशनधारकास कार्यादेश देण्यात येईल.

**Sd/-**

**उप आयुक्त (समाज कल्याण)**

**नाशिक महानगरपालिका, नाशिक**

# नाशिक महानगरपालिका,नाशिक
## कामगार कल्याण विभाग
## दरपत्रक/कोटेशन फॉर्म

**कामाचे नाव:- नाशिक महानगरपालिकेच्या कायम सेवेत असलेल्या सफाई कर्मचा-यांचे पाल्यांना मोफत वहया पुरविणे बाबत**

कोटेशन सादर करण्याची अंतिम मुदत :- दि०३/०८/२०२३ रोजी दुपारी ३:०० वाजेपर्यंत

कोटेशनधारकाचे नाव व पत्ता :- ---------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------------------------------------

संपर्क क्रमांक (मोबाईल क्रमांक/भ्रमणध्वनी क्रमांक) :----------------------------------------------------

उक्त प्रमाणे कामाचे अटीशर्ती नुसार नाशिक महानगरपालिकेच्या कामगार कल्याण विभागास कायम सेवेत असलेल्या सफाई कर्मचा-यांचे पाल्यांना मोफत वहया पुरविणे कामी मी/आम्ही पुढील प्रमाणे सर्व करांसह दर सादर करीत आहोत.

| अ.न | तपशिल<br>( मेक.नवनीत/सुंदरम/क्लासमेट कंपनीच्या) | एकूण वहया संख्या | प्रती वही नग किंमत सर्व करासह |
|---|---|---|---|
| १) | एक रेघी १०० पेजेस ६५ जी एस एम जम्बो वही १८-२४ सी एम सुबक व आकर्षक बांधणी, स्पेसिफिकेशन नुसार | २०१८ | |
| २) | एक रेघी २०० पेजेस वही ६५ जी एसएम जम्बो साईज १८-२४ सी एम सुबक व आकर्षक बांधणी, स्पेसिफिकेशन नुसार | २०१८ | |
| ३) | दुरेघी १०० पेजेस वही ६५ जी एसएम जम्बो साईज १८-२४ सी एम सुबक व आकर्षक बांधणी, स्पेसिफिकेशन नुसार | १३५ | |
| ४) | चार रेघी १०० पेजेस वही ६५ जी एसएम जम्बो साईज १८-२४ सी एम सुबक व आकर्षक बांधणी, स्पेसिफिकेशन नुसार | १३५ | |
| ५) | चित्रकला ३६ पेजेस वही ६५ जी एस एम जम्बो साईज २१-२९.०७ सी एम सुबक व आकर्षक बांधणी, स्पेसिफिकेशन नुसार | २९० | |
| ६) | प्रयोग वही १०० पेजेस वही ६५ जी एसएम जम्बोसाईज २१-२९.०७ सी एम सुबक व आकर्षक बांधणी, स्पेसिफिकेशन नुसार | १८३ | |
| | | ४७७९ | |

सदर कोटेशनसोबत असलेल्या सर्व अटी शर्ती मी वाचल्या असुन मला त्या मान्य आहेत. सदर अटी शर्ती प्रमाणे सदर कोटेशनमध्ये नमुद केलेल्या दराने उक्त वस्तु व सेवा पुरविणे / पुरवठा करण्यास मी तयार आहे. त्यासाठी या कोटेशनवर स्वाक्षरी करीत आहे .

दिनांक:-

ठिकाण:-

कोटेशन धारकाची सही व शिक्का

# नाशिक महानगरपालिका, नाशिक

## कामगार कल्याण विभाग

### ई कोटेशन सुचना( सन २०२३- २४)

**कामाचे नाव— नाशिक महानगरपालिकेच्या कायम सेवेत असलेल्या सफाई कर्मचा-यांचे पाल्यांना मोफत वहया पुरविणे बाबत.**

**सर्व साधारण अटी—शर्ती**

१) कोटेशन सोबतची कोटेशनधारकाची कोणतीही अट मान्य करता येणार नाही. सशर्त कोटेशन तात्काळ रद्द करण्यात येईल .

२) कोटेशन नोटिस मध्ये नमुद वहयांची संख्या अंदाजित असुन त्यामध्ये वाढ / घट होण्याची शक्यता आहे. वाढ / घट झाल्यास दिलेल्या दरानुसारच पुरवठा करणे बंधनकारक राहील.

३) दिलेल्या मुदतीमध्ये संपुर्ण काम करणे / सेवा पुरविणे आवश्यक आहे. काही अपरिहार्य कारणास्तव काम पुर्ण करणे शक्य नसल्यास तशी मुदतवाढ मिळणे बाबतचा आगाऊ अर्ज करणे आवश्यक राहिल. तथापी मुदतवाढ द्यावयाची किंवा कशी या बाबत महापालिकेचा निर्णय अंतिम राहील .

४) ज्यांचे कोटेशन दर मंजुर होईल त्या कोटेशनधारकास महानगरपालिकेचे लाभात र. रु. ५२०/- चे जनरल स्टॅम्प पेपरवर रितसर करारनामा करुन द्यावा लागेल. तसेच एक सक्षम जामीनदार द्यावा लागेल.

५) पात्र कोटेशन धारकास कमीत कमी र.रु. १५०००/- (प्राकलनाच्या एकूण रक्कमेच्या ) ५% सुरक्षा अनामत मनपा खजिन्यात भरुन त्याची पावती सादर करणे आवश्यक राहील.

६) जीएसटी करासह व अनुषंगीक खर्चासह कोटेशन दर नमुद करावयाचे आहे. कोणत्याही टॅक्सची जबाबदारी महानगरपालिकेवर राहणार नाही .

७) सदरचे मंजुर दराने कराराचे मुदतीपर्यंत वेळोवेळी गरजेनुसार काम करणे/सेवा पुरविणे बंधनकारक राहील. कार्यादेश दिल्यापासून किमान १५ दिवसांत वहयांचा पुरवठा करणे आवश्यक राहील.

८) मुदतीतकामन झाल्यास/सेवा न पुरविल्यास/मुदतीत काम पुर्ण न केल्यास सदरचे काम कोटेशनधारकाचे जबाबदारी व इतर ठिकाणाहुन करुन घेण्यात येईल आणि त्या कामी महानगरपालिकेस मंजुर दरापेक्षा जास्त खर्च आल्यास तो कोटेशन धारकाकडुन वसुल करण्यात येईल.

९) मंजुरीनुसार काम न झाल्यास / सेवा न पुरविल्यास, काम/ सेवा नाकारण्यात येईल व त्याबाबतचा महानगरपालिकेचा निर्णय अंतिम राहील .

१०) कोणतेही काम मंजुर केलेल्या दराने कोटेशनधारकाकडुन करण्याची महानगरपालिकेवर सक्ती नाही. याबाबत कोटेशनधारकास नुकसानभरपाई मागता येणार नाही.

११) अटी /शर्तीमधील एखाद्या शर्तीबाबत काही सवलत देणे अथवा आवश्यक अशा काही जादा अटी घालण्याबाबत महानगरपालिकेस अधिकार राहील.

१२) कोटेशन दर मंजुर झालेनंतर सदरच्या कामाच्या दरात/सेवेच्या दरात काही वाढ झाल्यास वाढलेल्या दराप्रमाणे कोटेशनधारकास जादा पैसे मिळणार नाही .

१३) अटिशर्तीचा भंग केल्यास त्यांचे बिलातुन रक्कम जप्त करण्यात येईल.

१४) काही कारणास्तव देयके अदा करणेस उशिर झाल्यास त्यावर व्याज अनुज्ञेय राहणार नाही.

१५) मा.शासनाचे गर्व्हमेंट ई मार्केटप्लस पोर्टलेवर सदरचे बाबीचे दर उपलब्ध असलेस आणि गुणवत्ते बाबत साम्य असल्यास अशा बाबत (GeM) वरील दराशी तुलना करणेत येईल. पोर्टलवरील दरापेक्षा कोटेशन दर कमी असल्यास असे दर मंजुर करणे बाबत विचार करणेत येईल अन्यथा (GeM) वरील दराने काम करणे बाबतचा अधिकार राखुन ठेवणेत येत आहे.

१६) कोटेशन सोबत शॉप ॲक्ट लायन्स्स / उद्योग आधार प्रमाणपत्र,पॅन कार्ड, संस्थेचे बँक खाते, जीएसटी नोंदणी प्रमाणपत्र इ. कागद पत्र स्वसाक्षांकित करुन सादर करणे आवश्यक राहील.

१७) मालाच्या नमुद तपशिलाप्रमाणे चांगल्या दर्जाच्या सुस्थितीतील वहयांचा पुरवठा करणे आवश्यक राहील. योग्य दर्जा नसल्यास केलेला पुरवठा नाकारण्याचा अधिकार समाज कल्याण विभागास राहील.

Sd/-
उप आयुक्त (समाजकल्याण)
नाशिक महानगरपालिका नाशिक

सदरचे अटी-शर्ती मी वाचल्या असुन सदरच्या अटी-शर्ती मला मान्य व कबुल असुन त्याप्रमाणे सेवा पुरविण्यास / काम करण्यास मी तयार आहे. त्यासाठी स्वाक्षरी करत आहे.

निविदाधारकाची सही व शिक्का